संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com
दैनिक
माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस
संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे
मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६
www.mandeshexpress.com

एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे
श्राव्या डायग्नोस्टिक्स
डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी
उपलब्ध सुविधा
डॉ.सौ. चैताली सतेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)
डॉ. सतेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M..S.)
* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार
पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

● वर्ष : ७ वे ● ● अंक : ५३ वा ● ● शनिवार दि. २६ ऑगस्ट २०२३ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

# 'ईडी 'पुढे महिलेचे धाडस

## शरद पवार : कर्ता पुरुष पुढे आला नाही : नाव न घेता मुश्रीफ यांच्यावर टीका

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कोल्हापूर :** कोल्हापूरला शौर्याची परंपरा आहे. 'ईडी'च्या अधिकार्यांसमोर येत एक महिला आमचे चुकले असेल तर स्वत:ला गोळ्या घाला म्हणते; मात्र त्या घरातील कर्ता पुरुष गप्प बसतो. एवढेच नव्हे तर पुढे न येता ईडीच्या दरबारात जाऊन बसतो., अशी घणाघाती टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी नाव न घेता मंत्री हसन मुश्रीफ यांच्यावर केली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने शुक्रवारी सायंकाळी दसरा चौकात आयोजित केलेल्या जाहीर निर्धार सभेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शाहू महाराज होते. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर पवार यांची ही पहिलीच सभा असल्यामुळे पवार काय बोलणार, याची उत्सुकता होती.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनेक प्रमुख कार्यकर्त्यांना ईडीने नोटिसा पाठविल्या. काहींना तुरुंगात पाठविले. मात्र त्यांनी आपला स्वाभिमान सोडला नाही. परंतू ईडीची नोटीस आल्यामुळे काहींनी आपला स्वाभिमान बाजुला ठेवून भुमिकाच बदलली. शौर्याची परंपरा




कोल्हापूर : येथील दसरा चौकातील जाहीर सभेला संबोधित करताना शरद पवार, मंचावर उपस्थित मान्यवर

असलेल्या कोल्हापुरात मात्र आपल्याला वेगळेच पहावयास मिळाले. ईडीच्या अधिकार्यांसमोर येऊन एक महिला आम्हाला गोळ्या घाला म्हणत, अशावेळी घरच्या कर्त्या पुरुषाने पुढे येणे आवश्यक होते. परंतू ते गप्प बसले. आणि भाजपसोबत जाऊन आपली सुटका करून घेतली, असा टोला पवार यांनी हाणला. शेतकर्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. बेरोजगार तरुणांची फौज वाढत आहेत.

महिला सुरक्षीत नाहीत. अशा सरकारला सत्तेवर राहण्याचा अधिकार नाही. या सरकारला खाली खेचण्यासाठी साथ द्या, असे आवाहनही पवार यांनी केले. ते पुढे म्हणाले, छत्रपती शिवराय व शाहूरायांनी सत्ता रयतेसाठी राबवायची असते हे आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. आज देशात नेमकी याच्या उलट परिस्थिती आहे. सत्तेचा वापर जनतेसाठी होताना दिसत नाही. त्यामुळे

शेतकर्यांच्या आत्महत्त्या वाढत आहे. बेकारी, महागाई वाढत आहे. मणीपूरमध्ये महिलांबाबत घडलेल्या घटनांकडे लक्ष देण्यास सरकारला वेळ नाही. चंद्रावर यान पाठवून भारताने जगात नाव मिळवले असले तरी देशातील महिला मात्र असुरक्षीत आहेत, अशा सरकारला सत्तेवर राहण्याचा अधिकारी नाही, असेही ते म्हणाले.

फुले, शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने काम करणार्या सर्व घटकांनी एकत्र येऊन काम केल्यास देशातील चित्र बदलण्यास मदत होईल. स्वाभिमानाने पुरोगामी विचाराने पवार लढत आहेत. त्यांना सर्वांनी साथ द्यावी.

कोल्हापुरात जे घडते ते पुढे देशात घडते. सध्या महाराष्ट्रात जे घडत आहे, ते थांबविण्यासाठी पक्षांतरबंदी कायद्यात बदल करणे आवश्यक आहे. तो अधिक कडक करण्याची गरज असल्याचे शाहू महाराज यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले.

महागाई, बेरोजगारी, शेतकर्यांच्या प्रश्नांना बगल देवून थोर पुरुषांचा अवमान करून पान नं. २ वर

# आदित्य जाधवचा उत्कृष्ट छात्र म्हणून सन्मान

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** येथील श्री भवानी विद्यालय व आबासाहेब खेबुडकर ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स आटपाडी या प्रशालेतील एनसीसी विभागातील कॅडेट आदित्य सचिन जाधव याचा उत्कृष्ट छात्र म्हणून सन्मान करण्यात आला.




कोल्हापूर : आदित्य जाधव याचा उत्कृष्ट छात्र म्हणून सन्मान करताना १६ महाराष्ट्र बटालियनचे अधिकारी

कोल्हापूर येथे १६ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. सांगली अंतर्गत एन.सी.सी. कॅम्प कोल्हापूर येथील एन.सी.सी. भवन येथे दिनांक २० ऑगस्ट २०२३ पासून सुरू झाला. या कॅम्पमध्ये कोल्हापूर हेडक्वार्टर अंतर्गत नऊ विविध बटालियन यांनी सहभाग घेतलेला आहे. सांगली, सातारा, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा कोल्हापूर येथे कॅम्प संपन्न झाला. या कॅम्पला महाराष्ट्र एनसीसी निदेशालय प्रमुख मेजर जनरल वाय.पी.खंडूरी यांनी भेट दिली. यावेळी उत्कृष्ट छात्र म्हणून आदित्य सचिन जाधव याला पदक देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला एनसीसी कोल्हापूर मुख्यालयाचे प्रमुख ब्रिगेडियर अभिजीत वाळिंबे, डेप्युटी कमांडर कर्नल थोरात साहेब १६ महाराष्ट्रचे कॅम्प कमांडट कर्नल अभिजीत बर्वे तसेच कर्नल पाथरकर कर्नल पिल्ले, ट्रेनिंग ऑफिसर यांच्यासह १६ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. सांगलीचे सी.ए.टी.सी. कॅम्प व महाराष्ट्र राज्य थलसेना कॅम्प प्रमुख उपस्थित होते. आदित्य सचिन जाधव याला एनसीसी अधिकारी राम जाधव यांनी मार्गदर्शन केले. आदित्य जाधवचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# 'रेखा' लघुपटाला राष्ट्रीय पुरस्कार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** ६९ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांवर तासगाव तालुक्यातील पेठ येथील दिग्दर्शक शेखर बापू रणखांबे यांनी नाव कोरले आहे. त्यांच्या 'रेखा' या लघुपटाला




नॉन फ़िक्शन गटात 'स्पेशल ज्युरी पुरस्कार प्राप्त झाला. शेखर रणखांबे हे तासगाव तालुक्यातील पेड येथील आहेत. त्यांनी सामाजिक विषयावर अनेक माहितीपट बनविले आहेत. रेखा या लघुपटात रस्त्याकडे जगणाऱ्या महिलांच्या आरोग्याचा विषय हाताळण्यात आला आहे. या महिला स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. या लघुपटात मासिक पाळीच्या काळात आरोग्याच्या वाईट स्थितीकडे लक्ष वेधले आहे.

या लघुपटात कलाकार, तंत्रज्ञ सांगलीतील आहेत. या लघुपटाने जगभर डंका गाजविला आहे. सांगली परिसरातील भाजी मंडई, बसस्टॉप आदी परिसरात लघुपटाचे चित्रीकरण झाले आहे. गतवर्षी भारतीय चित्रपट महोत्सव गोवा (इफ्फी) येथे लघुपटाची अधिकृत निवड झाली. महाराष्ट्र शासनाच्या स्वराज्य लघुपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट फिल्म, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक आणि सर्वोत्कृष्ट अभिनेत्री असे तीन पुरस्कार मिळाले होते.'रेखा' या लघुपटामध्ये सांगलीतील माया पवार, तमीना पवार, सत्याप्पा मोरे, वैशाली केंदळे, विशाल शिरतोडे, उमेश मालन, कुलभूषण काटे, गौतम कांबळे, अनुराधा साळुंखे, गजानन सूर्यवंशी, सूरज वाघमोडे आदींचा सहभाग आहे.

# डॉल्बीच्या दणदणाटातून आटपाडीकरांचा जीव वाचवा-सादिक खाटिक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी :** कर्णकर्कश दणदणाटाच्या जीवघेण्या डॉल्बीच्या अत्याचारातून लहान बालके , वृद्ध व्यक्ती, आजारी माणसे अशा आटपाडी पेठेतल्या शेकडो आटपाडीकरांचा जीव वाचवा. असे कळकळीचे आवाहन आटपाडीतल्या सेवानिवृत्त वयोवृद्धांच्या संघटनेने केले आहे. आटपाडी एस.टी. बसस्थानकापासून सुरु होणारी आटपाडीच्या मुख्य पेठेची सुरुवात आटपाडी ओढा पात्रालगतच्या बाजार पटांगणा पर्यत येवून संपते. अख्ख्या भारतात नसेल असा मुख्य रस्ता असलेली आटपाडीची मुख्य पेठ अतिशय अरुंद म्हणजे ३०-४० फुट इतक्या रुंदीची आणि अर्धा किमी इतक्या लांबीची आहे. पेठेतल्या नवीन बांधकाम करणाऱ्या प्रत्येकाने याच अरुंद रस्त्यावर काढलेल्या पायऱ्या, वर काढलेल्या पोर्चने आणखी रस्त्याला बकालपण बहाल केले आहे. जागोजागचे खाच, खळगे, खड्डे, खोदरे यामुळे रस्त्यावर चालणारे अनेक जण अनेक वेळा पिचकले आहेत. या डान्सींग रस्त्यावरून (या रस्त्यावरून चालताना खाचखळगे,खड्डे खोदरे, दुर्गंधी युक्त पाण्याच्या चिखलाने, चालताना आपसूक करावा लागणारा अंगविक्षेप म्हणजेच डांन्सीग रस्ता) चालणार्याच्या पायातल्या चढ उतार, खड्यांमुळे घसरणाऱ्या चपला एकीकडे आणि ती व्यक्ती दुसरीकडे झुकत असल्याने जागोजागी पडल्याने अनेकांनी औषधोपचारावर हजारों रुपये घालविले आहेत. पावसाळ्यात आणि सांडपाण्याच्या गटारीचे रस्त्यावरून वाहणाऱ्या वेळोवेळच्या दुर्गंधी युक्त पाण्याने ही मुख्य रस्त्याची घसरगुंडी अनेकांना आस्मान दाखविणारी, अनेक महिने जायबंदी करणारी ठरली आहे. अशा समृद्धतेने भरलेल्या या मुख्य रस्त्यावर उभी असणारी शेकडो दुचाकी वाहने या अस्ताव्यस्त बकालतेला आणखी अति सुंदर बनवत असते. तालुक्यातून आटपाडीत येणारे हजारो तालुकावाशीय, शिक्षणासाठी येणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांच्या प्रतिदिनीच्या लोंढ्याने या पेठेतून चालणे वावरणे अत्यंत जिकरीचे, संकटाचे बनले आहे. त्यातच आटपाडीचा भरणारा शनिवारचा आठवडा बाजार, या बाजार पटांगणाच्या परिसरात भरत



असल्याने तसेच भाजी पाल्याच्या मार्केटला या मुख्य रस्त्यावरूनच जावे लागत असल्याने सदैव गर्दीने भरलेला रस्ता असे या रस्त्याचे आजचे स्वरूप आहे.

अशा भयावह बनलेल्या मुख्य पेठेतल्या रस्त्यावरून निघणाऱ्या, गावदेव, सणा, समारंभ, उत्सव, वगैरेंसाठी निघणाऱ्या मिरवणुका त्यातील प्रचंड गर्दी आणि सर्वात वेदनादायक म्हणजे आवाज करणाऱ्या अनेक बॉक्सच्या प्रचंड आवाजातील डॉल्बीने आटपाडीकरांचे जीवन असह्य बनविले आहे. एक किलो मीटर परिघातला परिसर हादरेल अशा दणदणाटाने अनेकांचा जीव टांगलीला लागलेला असतो. घरटी एक व्यक्ती शुगर, बी.पी.असलेली, कोणते ना कोणते ऑपरेशन झालेली, अनेक आजारांशी झुंजणारी, अंथरुणावर खिळलेली आढळून येईल. लहान लहान बालके, विकलांग व्यक्ती, वयस्कर व्यक्ती अशा शेकडोंना या कर्णकर्कश डॉल्बीने गलीतगात्र, हतबल, हवालदिल आणि घाबरे गुबरे बनविले आहे. तक्रार करावी तर थोरा मोठ्या व्यक्ती, समुहाला अंगावर घेणे सामन्यांच्या आवाक्याबाहेरचे आहे. तक्रार करणाराला गावाबाहेर रहायला जाण्याचा उपदेश दिला जातो. धमकीचे डोस पाजले जातात. अशा नाईलाजाच्या चक्रात सापडलेल्या पेठे लगतच्या रहिवाशांवर एकप्रकारे अन्याय अत्याचारच सुरु आहेत. आटपाडी शहरातील विविध कार्यक्रम प्रसंगी डॉल्बीमुळे होणाऱ्या कर्णकर्कश आवाजाला आळा घालावा.अशी मागणी आटपाडीतील ज्येष्ठ नागरिक संघटनेने आटपाडी पोलिसांकडे नुकतीच केली आहे.डॉल्बीसारख्या कर्णकर्कश वाद्यांच्या प्रचंड आवाजाने शेकडोंच्या हृदयाचा थरकाप होतो. लहान बालके, माता, भगिनी, वयोवृद्धांना अथवा तरुणांनाही हृदयविकाराचा धक्का बसू शकतो. या भयानक आवाजाने नाहक जीवितहानी होवू शकते.आटपाडीच्या मुख्य पेठेतून कर्णकर्कश्य वादये वाजविणेस परवानगी दिलीच जावू नये.विनापरवाना अशी वाद्ये वाजविल्यास डॉल्बी वाद्य मालक, वाहनधारक, कार्यक्रमासाठी डॉल्बी आणणारे निमंत्रक यांच्यावर कडक पोलीस कारवाई केली जावीच. तथापि ही वाद्ये कायमस्वरूपी जप्त करून हे तथाकथीत मालके, हौसे, नवसे, गवसे यांच्यावरील कडक कारवाईतून या सर्वांचा सन्मान केला जावा. अशीच अपेक्षा हजारो सामान्य नागरीक करत आहेत.

# म्हैसाळ योजनेच्या पाण्यासाठी शेतकऱ्यांचा टाहो



जत : वन जमिनीतून चर काढली जात असताना वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी ते काम बंद पाडले, यावेळी उपस्थित शेतकरी व अधिकारी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**जत :** जत तालुक्यातील माडग्याळसह सात गावांना म्हैसाळ योजनेतून पाणी मिळावे यासाठी मायथळ कालव्यातून चर काढून पाणी द्यावे अशी गेली तीन वर्षे शेतकरी मागणी करीत आहेत. या मागणीला खासदार संजयकाका पाटील यांच्याकडे वारंवार मागणीही करण्यात आली. त्यांच्या प्रयत्नांने जलसंपदा विभागाने पाणी देण्यास मान्यता दर्शवली. खुदाईसाठीही राजकीय मदतीतून यंत्रसामुग्री उपलब्ध करून देण्यात आली. खुदाईसाठी खासदार निधीतून १२ लाखांचा निधीही मिळाला. आज या योजनेच्या खुदाईला सुरूवात होताच चर वन जमिनीतून जात असल्याने वन अधिकार्यांनी काम थांबवले. यामुळे खुदाईचे काम बंद करण्यात आले. यावेळी साहेब, राजकारण करू नका, आमच्या पाण्याला आडवू नका, आम्ही म्हैसाळचे पाणी येतय म्हणून गेली ४० वर्षे वाट पाहतोय, आम्हाला आत्महत्येची वेळ आणू नका, आम्हाला जगू द्या अशी आर्त हाक जत तालुक्याच्या दुष्काळी माडग्याळ भागातील शेतकर्यांनी वन विभागाच्या अधिकार्यांना शुक्रवारी विनवणी केली. यावेळी काही शेतकर्यांनी रडून अधिकार्यांना पाण्यासाठी आर्जवे केली.

भाऊ
कन्स्ट्रक्शन
बिल्डर्स & डेव्हलपर्स
9004792356
- उत्कृष्ट,दर्जेदार आणि मजबूत पध्दतीचे कामे.
- सर्वांच्या पसंतीत आणि विश्वासात नं.१ चे स्थान असलेले.

# निंबवडे जिल्हा परिषद शाळेचे दुहेरी यश

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**निंबवडे/वार्ताहर :** आटपाडी तालुक्यातील तडवळे येथे पार पडलेल्या वक्तृत्व स्पर्धेत निंबवडे केंद्राचे प्रतिनिधित्व करणारे जि.प. शाळा नंबर १ निंबवडेचा विद्यार्थी साईराज सतीश देसाई इ.७ वी याचा ६ वी ते ८ वी या गटामध्ये तालुक्यात प्रथम क्रमांक आला असून तो जिल्हास्तर स्पर्धेसाठी पात्र झाला आहे. तसेच मध्यम गटात ३ ते ५ या गटामध्ये चैतन्य सुखदेव देवडकर इयत्ता ५ वी याचा तृतीय क्रमांक आला. या दोन्ही विद्यार्थी यांचे शाळेच्या वतीने खूप अभिनंदन करण्यात आले. तसेच त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक महेश इंगवले, कृष्णदेव पिंजारी यांचे ही अभिनंदन करण्यात आले.

जिल्हास्तर सांगली येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी पात्र झाल्याबद्दल सदर



निंबवडे : जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना शाळेतील शिक्षक वर्ग

विद्यार्थ्यांचे गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय मोरे, विस्ताराधिकारी जगन्नाथ कोळपे, केंद्रप्रमुख यशवंत गोडसे, मुख्याध्यापक मारुती देवडकर, शाळेचे सर्व शिक्षक, विद्यार्थी यांनी कौतुक केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी शिक्षक रतिलाल गळवे, कृष्णदेव पिंजारी, गणेश सदाशिव नेहरकर, अमोल गुलाब मिसाळ, महेश इंगवले उपस्थित होते.

# संपादकिय

## पवारांचे दोन दगडांवर पाय!

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्याचं, पक्षात दोन गट पडले असले तरी, राष्ट्रवादीचे नेते मात्र अजूनही पक्षात फुट पडले नसल्याचे जाहीर सांगत सुटले असून यावर मात्र खुद्द शरद पवार यांनीच दोन दगडावर पाय ठेवल्याचे स्पष्ट होत असून यातून कार्यकर्ते मात्र संभ्रमात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवारांनी बारामतीत प्रसारमाध्यमांशी बोलताना अजित पवारांबद्दल मोठं वक्तव्य केलं आहे. शरद पवार म्हणाले, अजित पवार आमच्या पक्षाचे नेते आहेतच. त्यात कोणताही वाद नाही. राष्ट्रीय पातळीवर एक मोठा गट वेगळा झाला तर त्याला पक्षात फूट म्हणता येईल. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये तशी परिस्थिती नाही. काही लोकांनी वेगळी भूमिका घेतली आहे. परंतु, लोकशाही प्रक्रियेत तो त्यांचा अधिकार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटातील खासदार सुप्रिया सुळे यांनीदेखील अशाच प्रकारचं वक्तव्य केलं आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडलेली नाही. राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही जणांनी वेगळा निर्णय घेतला आहे. परंतु, त्याला फूट म्हणता येणार नाही. शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांची ही वक्तव्ये राष्ट्रवादीचे कार्यकर्ते आणि राज्यातील जनतेला गोंधळात टाकणारी आहेत. यावर खासदार संजय राऊत यांच्यासह काँग्रेसच्या नाना पटोले यांनी मात्र शरद पवारांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे.

खासदार संजय राऊत यांनी शरद पवारांच्या अजित पवारांबद्दलच्या वक्तव्यामुळे त्यांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करत, यावर आता शरद पवार यांनी उत्तर द्यावे लागणार असल्याचे नमूद केले आहे.

खासदार संजय राऊत म्हणाले, भाजपाबरोबर गेलेल्यांना, हुकूमशाही प्रवृत्तीबरोबर हातमिळवणी करणाऱ्यांना, अशा कोणत्याही नेत्याला किंवा पक्षाला महाविकास आघाडीत स्थान नाही. ईडीला घाबरून ज्यांना जायचं आहे ते जाऊ शकतात. मग ते आमच्याकडून गेलेले असतील अथवा राष्ट्रवादी काँग्रेसमधून गेलेले असतील, तो निर्णय त्यांचा आहे. जसं शरद पवार म्हणाले, ही लोकशाही आहे, त्यामुळे तो निर्णय त्यांचा असेल. परंतु, आमचेही (महाविकास आघाडी) काही निर्णय आहेत. त्यामुळे दोन दगडांवर किंवा तीन दगडांवर पाय अस राजकारण सध्या सुरु आहे.




# राज्य अधिस्वीकृती समिती अध्यक्षपदी यदु जोशी यांची निवड

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राज्य अधिस्वीकृती समिती – २०२३ ची पहिली बैठक मंत्रालयात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत ज्येष्ठ पत्रकार यदु जोशी यांची समितीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. समितीच्या सर्व म्हणजे २७ सदस्यांनी मतदान प्रक्रियेत सहभाग घेतला. मतमोजणीत श्री. जोशी यांना १९, तर श्री. जगदाळे यांना ८ मते मिळाली. मुंबई शहरचे उपजिल्हाधिकारी डॉ. विजयकुमार सूर्यवंशी यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले.


यदु जोशी

श्री. जोशी हे तीन दशकांपासून पत्रकारितेत कार्यरत आहेत. ते दै. लोकमतच्या मुंबई आवृत्तीचे सहसंपादक आहेत. यापूर्वीही त्यांनी राज्य अधिस्वीकृती समितीचे अध्यक्षपद भूषविले आहे. याशिवाय त्यांनी नागपूर श्रमिक पत्रकार संघाचे दोन वेळेस अध्यक्षपद आणि महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्षपदही भूषविले आहे.

या बैठकीस माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या महासंचालक जयश्री भोज, संचालक (माहिती) (प्रशासन) हेमराज बागुल, संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क) डॉ. राहुल तिडके तसेच अन्य अधिकारी उपस्थित होते.

महासंचालक श्रीमती भोज यांनी नवनियुक्त अध्यक्ष श्री. जोशी यांच्यासह सर्व सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. अधिस्वीकृती समितीचे नवनियुक्त अध्यक्ष श्री. जोशी यांनी उपस्थितांना धन्यवाद देत पत्रकारांच्या कल्याणासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. संचालक डॉ. तिडके यांनीनिवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सूर्यवंशी तसेचसर्वांचे आभार मानले.

# फसवणूक झालेला तक्रारदर गायब

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** बँकेकडून २ कोटी कर्जाचे प्रकरण मंजूर करून देतो असे म्हणत ६० लाख रुपयांची फसवणूक झालेली व्यक्तीच तीन दिवसांपासून गायब झाली आहे. त्यामुळे खळबळ उडाली आहे. तक्रारदारच गायब झाल्याने या प्रकरणाचे गूढ वाढले आहे. रमेश वीरभद्र किवटे असे बेपत्ता झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

याप्रकरणी रमेशयांचा मुलगा औंकार यांनी मिरज शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. रमेश किवटे यांचे घरालगत ज्वेलर्स नावाचे दागिने खरेदी-विक्रीचे दुकान आहे. २०२२ मध्ये चार जणांनी किवटे यांना बँकेचे दोन कोटी रुपयांचे कर्ज करून देतो असे सांगितले. त्यासाठी प्रोसेसिंग फी द्यावी लागेल असे म्हणून त्यांच्याकडून ६७ लाख ५० हजार रुपये घेण्यात आले.

बँकेची फी भरूनही किवटे यांना कर्ज मिळाले नाही. तसेच ६७ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी याबाबत २०२० मध्ये मिरज शहर पोलिसात चोघांविरुद्धकाकानी कीची तक्रार दिली. तसा, सार चोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. त्यामध्ये सचिन व्यंकटेश देशपांडे, अजय भंडारे उर्फ पवार, मिथुल त्रिवेदी तसेच अभिषेक पवार याची पत्नी यांचा समावेश आहे. तब्बल ६७ लाखांची फसवणूक झालेला फिर्यादी गायब झाल्याने या प्रकरणाचे गूढ वाढले आहे. याच्या मुळाशी जाऊन संशयितांना अटक करण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

# जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** विविध आंदोलने, आगामी सण, उत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था परिस्थिती अबाधित रहावी या करीता प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जिल्हादंडाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी सन १९५१ च्या महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सांगली जिल्हा स्थलसिमा हद्दीत दि. २६ ऑगस्ट २०२३ ते ८ सप्टेंबर २०२३ अखेर पर्यंत खालील कृत्ये करण्यास मनाई केली आहे.


या आदेशानुसार शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या अथवा लाठ्या किंवा शारिरीक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी इतर कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे किंवा क्षेपणास्त्रे किंवा सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने बाळगणे, जमा करणे आणि तयार करणे, व्यक्तीचे अथवा प्रेते किंवा आकृत्या किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, जाहीरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्ये वाजविणे या कृत्यांना मनाई केली आहे. तसेच ज्याच्या योगाने शांतता व सुव्यवस्था आणि सार्वजनिक मालमत्तेस धोका निर्माण होईल किंवा सभ्यतेला बाधा येईल अशा पध्दतीने हावभाव करणे, फलक चित्रे किंवा चिन्हे तयार करणे, त्यांचे प्रदर्शन करणे आणि प्रसारीत करण्यास मनाई केली आहे. जिल्ह्यात परवानगीशिवाय पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर एकत्र जमण्यास मनाई केली आहे.

हा आदेश कायदेशीर कर्तव्य बजावीत असलेल्या शासकीय कर्मचारी, धार्मिक विधी, अंत्यविधी व परीक्षा यांना लागू राहणार नाही. हा आदेश दि. २६ ऑगस्ट २०२३ रोजीचे ००.०० वाजल्यापासून ते दि. ८ सप्टेंबर २०२३ रोजीचे २३.५९ वाजेपर्यंत अंमलात राहील, असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी दिले आहेत.

# मत्स्योद्योग विकास धोरण समितीच्या अध्यक्षपदी राम नाईक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** भूजलाशयीन आणि सागरी जिल्ह्यांत मत्स्योद्योग विकास धोरण निश्चित करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीत आता अंशतः बदल करण्यात आला आहे. उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल राम नाईक यांची समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राज्याच्या इतिहासात प्रथमच मत्स्य व्यवसाय विकास धोरण होत असून मत्स्य व्यवसायाचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने ते साह्यभूत ठरणार आहे.


राम नाईक

या समितीत सागरी जिल्ह्यांतील तसेच भूजलाशयीन प्रत्येकी दोन विधानसभा सदस्य व एक विधानपरिषद सदस्यांच्या नावांचा समिती सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे. राज्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी या विभागाची सूत्रे स्वीकारतानाच स्वतंत्र धोरण तयार करण्याची घोषणा केली होती.

समिती गठित करण्यासंदर्भात शासन निर्णय २४ ऑगस्ट, २०२३ रोजी निर्गमित केला असून आयुक्त (मत्स्यव्यवसाय) यांच्या ऐवजी आता श्री राम नाईक यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती कार्य करेल. या समितीत महेश बालदी (विधानसभा सदस्य), मनीषा चौधरी (विधानसभा सदस्य), आशिष जयस्वाल( विधानसभा सदस्य), पंकज भोयर (विधानसभा सदस्य), रमेश पाटील (विधानपरिषद सदस्य), प्रवीण दटके (विधानपरिषद सदस्य), आयुक्त मत्स्यव्यवसाय, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, मुंबई, उप सचिव (मत्स्यव्यवसाय), मंत्रालय, मुंबई, सहआयुक्त मत्स्यव्यवसाय (भूजल), सहआयुक्त मत्स्यव्यवसाय (निमखारे), वैज्ञानिक, केंद्रीय मत्स्यकी अनुसंधान संस्था (CIFE), मुंबई, सागरी जिल्ह्यांतील सहकारी मच्छिमार संस्थांचे १ प्रतिनिधी, भूजल जिल्ह्यांतील सहकारी मच्छिमार संस्थांचे १ प्रतिनिधी, केंद्रीय समुद्री मत्स्यिकी अनुसंधान संस्था (CMFRI), मुंबई यांचे प्रतिनिधी, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचे प्रतिनिधी, मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील सेवाभावी संस्थांचे (NGO)२ प्रतिनिधी आदींचा समावेश आहे. सह आयुक्त मत्स्यव्यवसाय (सागरी) हे समितीचे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील.

# ‘ईडी ’पुढे महिलेचे धाडस

**पान नं. १ वरुन :** लोकांची दिशाभुल केली जात आहे. सत्तेचा गैरवापर करत खोके देऊन, ईडीची भिती दाखवून आमदार फोडणार्यांना रोखण्यासाठी पुरोगामी विचाराला साथ द्यावी, असे आवाहन आ.अनिल देशमुख यांनी केले. समतेची, पुरोगामी भूमी म्हणून ओळखण्यात येणार्या कोल्हापुरातील गद्दारांना ठेचण्यासाठी कोल्हापुरी चप्पल हातात घ्यावे, असे आ. जितेंद्र आव्हाड म्हणाले. आमदार रोहित पोवार म्हणाले, राष्ट्रवादी पक्ष फुटलेला नाही. राष्ट्रवादी पक्ष एक विचारधारा आहे.

प्रतिगाम्यांना त्यांची जागा दाखविण्यासाठी स्वाभिमानी विचारांच्या राष्ट्रवादीला बळ देण्याचे आवाहन आ. रोहित पवार यांनी केले. महाराष्ट्राच्या मातीने नेहमीच दिल्लीला पाणी पाजल्याचे ऐतिहासिक संदर्भ आहेत. त्याची पुनरावृत्ती २०२४ च्या निवडणुकीत होईल, असा विश्वास रोहित आर. पाटील यांनी व्यक्त केला.

शिव-शाहू, फुले-आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांशी तडजोड न करता जातीवाद्यांना त्यांची जागा दाखविण्यासाठी राष्ट्रवादीला साथ द्यावी, असे आवाहन राजीव आवळे यांनी केले. यावेळी विकास लवांडे, रामराजे कुपेकर, अमर चव्हाण, शिवाजी खोत आदिंची भाषणे झाली. स्वागत राष्ट्रवादीचे शहर अध्यक्ष आर.के.पोवार यांनी केले. ही सभा महाराष्ट्राला भविष्यात नवी दिशा देणारी ठरेल असे त्यांनी सांगितले. जिल्हाध्यक्ष व्ही.बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, निष्ठावंत कार्यकर्त्यांचा व स्वाभिमानी जनतेचा आपल्याला प्रतिसाद आहे. येत्या निवडणुकीत लोकभेच्या २ आणि विधानसभेच्या ५ जागा निवडून आणण्यासाठी कार्यकर्ते कामाला लागले आहेत. यावेळी खा. श्रीनिवास पाटील, आ. अरुण लाड, आ. बाळासाहेब पाटील, संध्यादेवी कुपेकर, प्रतिक पाटील, अशोक जांभळे, विद्या चव्हाण, शिवाजीराव नाईक, मानसिंग नाईक आदी उपस्थित होते. आभार राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी मानले.

# नीरजची जागतिक ॲथलेटिक्सच्या फायनलमध्ये धडक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** टोकियो ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता नीरज चोप्राने बुडापेस्ट (हंगेरी) येथे सुरू असलेल्या जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये शानदार खेळ दाखवला. त्याने पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान निश्चित केले आहे. नीरजने पहिल्याच प्रयत्नात ८८.७७ मीटर भालाफेक करून अंतिम फेरीत स्थान मिळवले. अंतिम सामना २७ ऑगस्ट रोजी होणार आहे.



नीरज चोप्रा

नीरजने जसा भाला फेकला, त्यानंतर त्याच्या हा थ्रो पाहून सर्वांचे डोळे विस्फारले. त्याने फेकलेला हा भाला ९० मीटरचे अंतर सहज कापेल असा अंदाज तज्ज्ञांनी लावला. पण भाला ९० मीटरचा टप्पा ओलांडू शकला नाही. असे असतानाही भारताच्या स्टार खेळाडूने विश्वविक्रम केला. ८८.७७ मीटरसह जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत पोहोचणारा नीरज पहिला खेळाडू ठरला.

नीरज चोप्राला गट-अ मध्ये स्थान देण्यात आले, ज्यात गतविजेते अँडरसन पीटर्स आणि ज्युलियन पीटर्स यांचाही समावेश आहे. पाकिस्तानच्या अर्शद नदीम आणि जेकब वडलेच या स्टार खेळाडूंना ब गटात ठेवण्यात आले आहे. भालाफेक स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान मिळवण्यासाठी ८३ मी. भालाफेक करायचे होते. नीरज चोप्रासाठी हे लक्ष्य सहज पार केले.




# आटपाडीत ढोल-ताशा वाजवून आंदोलन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी तालुक्यातील विविध प्रश्नांवरती आम्ही आंबेडकरवादी संघटनेच्या वतीने, वंचित बहुजन आघाडीचे जेष्ठ नेते अरुण वाघमारे यांचे मार्गदर्शनाखाली आटपाडी पोलीस स्टेशन व तहसील कार्यालय येथे आंदोलन करण्यात आले.

यामध्ये गळवेवाडी येथील लक्ष्मण हरिबा साठे कुटुंबावर झालेला अन्याय, सचिन हेगडे याच्यावर खोटा विनयभंग गुन्हा, डॉ. तुळशीराम शिंदे यांना केलेली जातीवाचक शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी, करगणी येथे सोशल मिडियाच्या माध्यमातून समाजात तेढ निर्माण करणारे मेसेज ठेवणे, मुस्लीम बांधवाना कलम १४९ ची दिलेली नोटीस, साठेनगर शाळेला धान्य गोडावूनची मैदानासाठी जागा मिळाली, दिघंची यथे काढण्यात आलेल्या भगवा रॅलीला कुणी परवानगी दिली, तसेच महापुरुषां बद्दल जाहीरपणे आक्षेपार्ह विधान करणाऱ्या मनोहर कुलकर्णी याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा यासह विविध मागण्यासाठी मोर्चा काढण्यात येवून आंदोलन करण्यात आले.



**आटपाडी : पोलीसाकडून नागरिकांच्यावर खोटे गुन्हे दाखल करण्यात आलेल्या निषेधार्थ काढण्यात आलेला मोर्चा**


यावेळी आम्ही आंबेडकरवादी संघटनेचे शैलेश ऐवळे, सनी कदम, ताजुद्दीन झारी, अमित वाघमारे यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले. बाजार पटांगण येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून मोर्चाची सुरुवात करण्यात आली. मोर्चा पोलीस ठाणे येथे आल्यावर ढोल, सनई, ताशा वाजवून निषेध व्यक्त करण्यात आला.

### सोशल मीडियावर ’स्क्रिनशॉट’ व्हायरल

# कोल्हापूरची शरद पवारांची सभा मुश्रीफांनी पाहिली?

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कोल्हापूर :** राष्ट्रवादीतील बंडखोरीनंतर शरद पवार हे पक्षाच्या पुनर्बांधणीसाठी पुन्हा कंबर कसली आहे. याचवेळी त्यांनी अजित पवार गटात गेलेल्या नेत्यांच्या मतदारसंघात सभांचा धडाका लावला आहे. सर्वात आधी छगन भुजबळांचा येवला, धनंजय मुंडेंच्या बीडनंतर आता शुक्रवारी तिसरी सभा हसन मुश्रीफांच्या कोल्हापुरात झाली. आजपर्यंत पवारांच्या प्रत्येक कोल्हापूर दौरा किंवा तेथील सभेत मुश्रीफ पहिल्यांदा हजर असायचे. पण राष्ट्रवादीत प्रवेश केल्यापासून पहिल्यांदाच त्यांच्याशिवाय सभा पार पडली. मात्र, तरीदेखील पवारांची सभा मुश्रीफांनी ऑनलाईन पाहिल्याची चर्चा सोशल मीडियावर रंगली आहे.




राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ‘स्वाभिमान सभा’कोल्हापूरच्या दसरा चौकात पार पडत आहे. या सभेत बोलताना पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांच्यावर जोरदार हल्लाबोल केल्यामुळे ही सभा हा चर्चेचा विषय असला तरी, पवारांची सभा मुश्रीफ लाईव्ह पाहत असल्याचे स्क्रिनशॉट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. शरद पवार यांनी कोल्हापूरच्या सभेत अजित पवार गटाचे नेते हसन मुश्रीफ यांच्यावर जोरदार शाब्दिक हल्ले चढवले. पण हीच सभा हसन मुश्रीफ फेसबुकच्या माध्यमातून पाहत होते का असा सवाल उपस्थित केला आहे. त्याचा स्क्रिनशॉट राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

दैनिक
माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस






# डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या निधीसाठी प्रयत्न करणार

## मंत्री रामदास आठवले : कोळा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर अस्थि विहार स्मारकाचे लोकार्पण





कोळा १) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थीचे दर्शन घेताना मंत्री रामदास आठवले, आम. शहाजीबापू पाटील, दीपकआबा साळुंखे पाटील, राजाभाऊ सरवदे, गटविकासअ अधिकारी आनंद लोकरे २) डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थी स्मारक उद्घाटनप्रसंगी बोलताना रामदास आठवले व मंचावर उपस्थित मान्यवर ३) गावातून काढण्यात आलेल्या अस्थी मिरवणूक प्रसंगी मिरवणुकीमध्ये सामील झालेले भिम अनुयायी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगोला/वार्ताहर :** कोळा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर अस्थि विहार स्मारक हे प्रेरणा देणारे स्मारक असून या स्मारकाच्या निधीसाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संपर्क करून या स्मारकाच्या उर्वरित कामाच्या निधीसाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी कोळे ता. सांगोला येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थि विहार स्मारक उद्घाटन प्रसंगी केले. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार ड.शहाजीबापू पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष माजी आमदार दीपकआबा साळुंखे पाटील, आरपीआय प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे, पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ.बाबासाहेब देशमुख, युवा नेते डॉ. अनिकेत देशमुख, आरपीआय सांगली जिल्हाध्यक्ष राजेंद्र खरात, माजी नगराध्यक्ष रफिक नदाफ, भाजपा जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार, मा.जि.प.सदस्य ड.सचिन देशमुख, माजी सभापती संभाजी आलदर, माजी पं.स.सिताराम सरगर, आरपीआय सांगोला तालुकाध्यक्ष खंडू सातपुते, कोळा गावच्या सरपंच राजश्री सरगर, उपसरपंच डॉ.सादिक पटेल सोलापूर जि.प.चे अति.मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर, बांधकाम विभागाचे उपअभियंता मिलिंद ठोंबरे, गट विकास अधिकारी आनंद लोकरे, आदी मान्यवर उपस्थित होते.

रामदास आठवले पुढे बोलताना म्हणाले, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या संविधानामुळेच आज मी या पदावर पोहचलो आहे.बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानामुळेच आज देशात शांती व एकता आहे. मी ज्या विभागाचा मंत्री आहे त्या विभागाच्या विविध योजनांचा नागरिकांनी लाभ घ्यावा. तसेच या स्मारकामध्ये महाकरुणी तथागत भगवान गौतम बुद्ध यांची ८ ते १० फुटी पुतळा बसविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ते म्हणाले.

सांगोल्याचे आमदार शहाजीबापू पाटील म्हणाले, कोळे या ठिकाणी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थि असणे हे तालुक्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. या स्मारकाच्या उर्वरित बांधकामाच्या निधीसाठी सर्वोतपरी प्रयत्न करणार असल्याचे ते म्हणाले. तर आमदार शहाजीबापू पाटील यांना सोबत घेवून स्मारकाच्या उर्वरित कामाच्या निधीसाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन माजी आमदार दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी केले.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक ड.सचिन देशमुख यांनी केले. स्मारकाच्या मंजुरी पासून ते स्मारकाच्या पहिल्या टप्यातील पूर्ण झालेल्या कामाबाबत आढावा दिला. पहिल्या टप्यातील कामामध्ये अस्थी विहार, ग्रंथालय व ध्यान साधना केंद्र याची कामे झाले असून उर्वरित कामे करणे बाकी आहे.सदर स्मारकाचे काम हे जिल्हा परिषदेच्या स्व:उत्पन्नातील असून संपूर्ण काम पूर्ण होण्यासाठी अजून १०.५ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. तो निधी त्वरित मिळावा यासाठी केंद्रीय मंत्री व तालुक्यातील नेतृत्व व नेते मंडळी प्रयत्न करावा. या ठिकाणी कोळे गावचे सुपुत्र कै.महिपतराव मोरे यांच्या मुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी आल्या आहेत त्यामुळेच आज या ठिकाणी स्मारक साकारले आहे असे त्यांनी आपल्या प्रस्ताविकामधून सांगितले.

सकाळी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र अस्थी कलशाची व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची लुम्बिनी विहार ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारका पर्यंत गावातील प्रमुख मार्गावरून फुलांची मुक्त उधळण करत मिरवणूक काढण्यात आली. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जय घोषाने सारा परिसर दुमदुमला होता. भन्ते धम्मदीप यांच्या उपस्थिती मध्ये स्मारकामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थींची विधीकार्य प्रतिष्ठाना करण्यात आली. यावेळी सफेद वस्त्र परिधान करून भिम अनुयायी मोठ्या संखेने उपस्थित होते.

स्मारकासाठी आपली २ एकर जमीन दान देणारे मुकुंद मोरे यांचा रामदास आठवले व प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. शेवटी मान्यवरांचे आभार प्रदर्शन नंदू मोरे यांनी मानले. सदरचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ व भिमराज प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# वाढदिवसानिमित्त आश्रम शाळेत अन्नदान

## मामासाहेब पांढरे यांनी वाढदिवसानिमित्त जपली सामाजिक बांधिलकी



नातेपुते : मोरोची येथील आश्रमशाळेत मामासाहेब पांढरे यांच्या वाढदिवसानिमित्त अन्नदान करताना मामाश्री प्रतिष्ठाणचे पदाधिकारी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नातेपुते/वार्ताहर :** प्रत्येकाची वाढदिवस साजरा करण्याची संकल्पना वेगवेगळी असते.वाढदिवस म्हटला की केक, पुष्पगुच्छ व परिचय लोकांसोबत पार्टी करून दिवस साजरा करण्याचा प्रघात आहे.आपल्या आनंदासाठी सर्वजण पैसा खर्च करतात पण अशा आनंदाच्या प्रसंगी समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी सोबत वाढदिवस करून आपल्या आनंदायी क्षण साजरा करण्याची प्रथा मामाश्री प्रतिष्ठाण नातेपुते यांच्या वतीने अकलूज कृषी उत्पन्न समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे यांचा वाढदिवसा निमित्त मोरोची येथील आश्रमशाळेत शिकणाऱ्या अनाथ, आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना अन्नदान करून वाढदिवस साजरा करण्यात आला.

यावेळी मामाश्री प्रतिष्ठाणचे अध्यक्ष तेजस पाटील, बाबा बोडरे, नवनाथ पांढरे, विनोद शेंडगे, महेश लांडगे, नाना सोरटे, गणेश निटवे, बंडा कुचेकर, वैभव सुळ, सुरज पाटील, नितीन ढवळे, हर्षद भुसारे, सौरभ पाटील, आण्णा पांढरे, महंमद तांबोळी, भाऊ लाळगे, रणजित वारे व मामाश्री प्रतिष्ठाणाचे सदस्य उपस्थित होते.

# शेटफळे येथे शेखर रणखांबे यांचा सन्मान



शेटफळे : शेखर रणखांबे यांचा सन्मान करताना उपस्थित मान्यवर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** तासगाव तालुक्यातील पेड गावचे सुपुत्र शेखर बापू रणखांबे यांच्या रेखा या लघुपटाला भारत सरकारच्या वतीने दिल्या जाणाऱ्या चित्रपट पुरस्कारात नॉन फिचर कॅटेगरी मध्ये स्पेशल ज्युरी अवॉर्ड ची घोषणा झाली. १७ वर्षांच्या चित्रपटसृष्टीतील खडतर परिश्रमातून त्यांना हे यश प्राप्त झाले आहे. त्यांच्या आगामी सिनेमाचे काम आटपाडी तालुक्यातील शेटफळे या गावी सुरू आहे. राष्ट्रीय पुरस्काराची घोषणा झाल्यानंतर शेटफळे ग्रामस्थांकडून त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

ग्रामपंचायत सदस्य विजय देवकर यांच्या पुढाकाराने हा सत्कार आयोजित करण्यात आला होता. ज्येष्ठ साहित्यिक सयाजीराजे मोकाशी यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला. यावेळी, गावाकडेच डोंगराएवढं कर्तृत्व असलेली माणसं जन्म घेतात. असे उद्गार त्यांनी आपल्या मनोगतात काढले. फिल्मच्या टीममधील विशाल शिरतोडे, विक्रम शिरतोडे, ऋषीकेश पवार यांनी मनोगत व्यक्त केले.

विचारमंचावर प्राचार्य सयाजीराजे मोकाशी, तंटामुक्ती समिती अध्यक्ष सी.पी.गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ गायकवाड, माणगंगा साखर कारखान्याचे संचालक किसन गायकवाड, माजी मुख्याध्यापक बाळासो गायकवाड, संभाजी देवकर, ग्रामपंचायत सदस्य विजय देवकर हे उपस्थित होते. शेखर रणखांबे यांच्या टीम मधून विशाल शिरतोडे, विक्रम शिरतोडे, गणेश धोत्रे, ऋषीकेश पवार, प्रतीक साठे, मनोज गवळी, सुचेता इंगळे हे उपस्थित होते. याबरोबर शेटफळे ग्रामस्थ आणि युवा वर्गाची लक्षणीय उपस्थिती होती.




# सांगलीत सहा लाखाची रोकड लंपास

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** सांगली शहरातील कुपवाड ते लक्ष्मी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावरील पेट्रोल पंपानजीक दोघांनी पाठलाग करुन तरुणाला मारहाण करत त्याच्याकडील सहा लाखांची रोकड लंपास केली. त्यानंतर त्याचीच दुचाकी घेवून संशयितांनी पलायन केले. ही घटना दि. २४ दुपारी तीनच्या सुमारास घडली. याबाबत संजयनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सुरज काळे (रा. जुना बुधगाव रस्ता, यल्लम्मा मंदिरानजीक, कुपवाड) आणि अन्य एक अनोळखी अशी गुन्हा दाखल ची नावे आहेत. अक्षय संपत सूर्यवंशी (रा. जुना बुधगाव रस्ता, अजिंक्यनगर, कुपवाड) यांनी फिर्याद दिली आहे.

अक्षय सूर्यवंशी यांचा मूर्तीकाराचा व्यवसाय आहे. दि.२४ रोजी दुपारच्या सुमारास ते त्यांच्या दुचाकीवरुन (क्र. एमएच १० डी एफ ११५१) जात असता अगोदरपासून असणाऱ्या संशयीत सुरज काळे याने साथीदारामवेत येवून त्याची दुचाकी (एमएच १० सीई ३०१३) आडवी मारली आणि सूर्यवंशी यांना खाली पाडून मारहाण करत रोख सहा लाख रुपयांची रोकड घेवून त्याचीच दुचाकी घेवून पसार झाले. दिवसाढवळाढवळ्या घडलेल्या या घटनेने परिसरात भीतीने वातावरण निर्माण झाले आहे.

# तुरची येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रात क्रीडा स्पर्धा संपन्न

## जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीस वितरण



तुरची : येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रात क्रीडा स्पर्धेमध्ये यश मिळालेल्यांचा सत्कार करताना जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** पोलीस प्रशिक्षण केंद्र तुरची येथे झालेल्या पोलीस अंमलदारांच्या क्रीडा स्पर्धेतील विजेत्यांना जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. पोलीस अंमलदार सत्र क्रमांक ८ च्या वार्षिक क्रीडा स्पर्धा २३ ते २५ ऑगस्ट या कालावधीत प्राचार्य धीरज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाल्या.

या स्पर्धा खोखो, कबबड्डी, भालाफेक, कुस्ती अशा २० क्रीडा प्रकारात झाल्या. स्पर्धेत ५०० प्रशिक्षणार्थीनी सहभाग घेतला.

स्पर्धा बक्षीस वितरण समारंभानंतर जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी प्रशिक्षणार्थींच्या तंदुरूस्तचे कौतुक करून, त्यांना भविष्यातील आव्हान व आयुष्यात व्यायामाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमास पोलीस प्रशिक्षण केंद्राचे उप प्राचार्य (प्रशासन) उदय डुबल, उपप्राचार्य (प्रशिक्षण) सुजय घाटगे यांच्यासह पोलीस अधिकारी, अंमलदार आणि त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

# सांगलीची खासदारकीची जागा 'स्वाभिमानी' लढणार



सांगली : मालगाव येथे राजू शेट्टी व महेश खराडे यांचा सत्कार करताना उपस्थित मान्यवर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** कोणताही पक्ष स्वार्थासाठी शेतकऱ्यांची बाजू घेतो, मात्र सत्ता येताच त्यांना शेतकऱ्यांचा विसर पडतो. ही राजकीय व्यवस्था उलथून टाकण्यासाठी शेतकऱ्यांनी माझ्या जोडीला सांगली लोकसभा मतदारसंघातूनही स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा खासदार संसदेत पाठविण्यासाठी तयारीला लागावे, असे आवाहन माजी खा.राजू शेट्टी यांनी केले.

मालगाव येथे आयोजित शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी शालेय पोषण आहारात बेदाण्याचा समावेश करण्यासाठी प्रयत्न केल्याबद्दल शेट्टी व जिल्हाध्यक्ष महेश खराडे यांचा सत्कार उपाध्यक्ष संजय खोलकुंबे व तालुकाध्यक्ष सुरेश वावडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सावकार मदनाईक, मिलिंद साखरपे संजय बेले उपस्थित होते.

शेट्टी म्हणाले, विरोधी पक्षात असताना देवेंद्र फडणवीस सोयाबीनला आठ हजार दर मागत होते. आता सोयाबीन दर पाच हजार झाला आहे. सत्तेत असताना यावर ते बोलत नाहीत. शरद पवार सत्तेत होते त्यावेळी वीज दरावर काही बोलत नव्हते, मात्र सध्या ते वीज दरवाढीला विरोध करत आहेत. सर्वच राजकीय पक्ष सत्ता नसताना स्वार्थासाठी शेतकरी हितावर बोलतात, मात्र सत्ता मिळताच शेतकऱ्यांना विसरतात हे वास्तव आहे.

ऊस, द्राक्षासह कोणतीही शेती सध्या परवडत नाही. याचे कारण उत्पादन खर्च प्रचंड वाढलेला आहे. मात्र, त्या तुलनेत शेतीमालाचे भाव वाढत नाहीत. शेतकऱ्यांना कोणताच टॅक्स नाही असे अनेकजण ओरडत असतात. पण, ऊस उत्पादक शेतकरी राज्य आणि केंद्र शासनाला ३३ हजार कोटी रुपये कर देतोय. त्यामुळे आमचे उत्पन्न सिद्ध करा आणि आम्हालाही इन्कम टॅक्स लावा, असे जाहीर आवाहन त्यांनी केले.

# माण खटाव ला दुष्काळ जाहीर करण्यासाठी रास्ता रोको

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/अहमद मुल्ला :** ऑगस्ट महिना संपाला तरी माण व खटाव तालुक्यात अजूनही पावसाची हजेरी नाही. त्यामुळे राज्य सरकारला ला जागे करण्यासाठी युवक कांग्रेसच्या वतीने दहीवडी येथे दिनांक २६ रोजी रोजी सकाळी ११.०० वाजता रस्ता रोको करण्यात येणार असल्याची माहिती माहिती युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ.सागर सावंत यांनी दिली.

पुढे बोलताना डॉ. सागर सावंत म्हणाले, केंद्र व राज्य शासनाच्या चूकीच्या धोरणांमुळे जीवनावश्यक वस्तुंचे भाव वाढलेले आहेत. बेरोजगारीचा दर प्रचंड वाढलेला असतानाही वेगवेगळ्या सरळ सेवा भरती परिक्षांमध्ये होणारा गोंधळ, कांद्यावर लावण्यात आलेला निर्यात शुल्क याविरोधात महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष कुणाल राऊत व महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष शिवराज मोरे यांच्या नेतृत्वाखाली सातारा जिल्हा युवक काँग्रेसच्या व माण-खटाव युवक काँग्रेसच्या वतीने दहीवडी येथे २६ आगस्ट २०२३ रोजी ११ वाजता दहीवडी येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.

# नातेपुते येथे धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नातेपुते/वार्ताहर :** नातेपुते येथील प्रसिद्ध खंडोबा मंदिर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पथ मेन पेठ मार्तंड देवस्थान या ठिकाणी सुवर्ण कलशारोहण समिती व समस्त धनगर समाज बांधवाच्या वतीने दिनांक २७ व २८ ऑगस्ट रोजी दोन दिवशीय खंडोबा मंदिर सुवर्ण कलशारोहण कार्यक्रमाच्या निमित्ताने धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



नातेपुते नगरीतील आराध्य दैवत श्री खंडोबा तथा मार्तंड देवस्थानाच्या मंदिराला सुवर्ण कलश बसवण्याचा कार्यक्रम सोहळा साजरा होणार आहे. रविवार दि.२७ ऑगस्ट रोजी भव्य सुवर्णकलश मिरवणुक सकाळी काढण्यात येणार आहे. तसेच कलशस्वागत होमहवन दुपारी महाप्रसाद व फराळ होणार आहे.

सोमवार दि.२८ ऑगस्ट रोजी सकाळी गणेशपुजन, पुण्यहवन वाचन, देवता स्थापना, जलादिवास, न्यादिवास, अग्निस्थापना, नवग्रह स्थापना, होमहवन पुजा होईल. सकाळी १२.३० यावेळेत सुवर्ण कलश बसविणे कलशारोहण, भजन होऊन महंत ह.भ.प.भगवान महाराज वरपगांवकर बीड, यांचे हस्ते सुवर्णकळस बसविण्यात येणार आहे. यानंतर महाप्रसाद होईल व सायं ५ ते ७ या वेळेमध्ये ह.भ.प.भगवान महाराज वरपगांवकर बीड यांचे किर्तन होऊन या कार्यक्रमाची सांगता होईल.

या कार्यक्रमासाठी धनंजय मधुकर गरगडे व दीपक अशोक पिसे व गणेश उराडे बापू फ्रेंड्स ग्रुप यांच्याकडून महाप्रसाद देण्यात आलेला आहे. तरी समाजातील सर्व बांधवांनी व भाविकांनी या सर्व कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन सुवर्ण कलशारोहण समिती नातेपुते व समस्त खुटेकर धनगर समाज नातेपुते यांच्या वतीने करण्यात आलेले आहे.

# बुद्धिबळ स्पर्धेत बोराटे, काळे यांचे यश

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नातेपुते/वार्ताहर :** अकलूज येथे झालेल्या बुद्धिबळ क्रीडा प्रकारात नातेपुते येथील डॉ.बा.ज.दाते प्रशालेतील विद्यार्थी श्रवण बोराटे, हर्षवर्धन काळे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्यामुळे त्यांची जिल्हास्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



**नातेपुते : बुद्धिबळ स्पर्धेत यश मिळविलेल्या श्रवण बोराटे, हर्षवर्धन काळे यांचा सत्कार करताना उपस्थित मान्यवर**

यशस्वी विद्यार्थी यांना क्रीडा प्रमुख राजेंद्र काळे, बापूराव मोहिते, रितू पिसे, यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे मार्गदर्शक बाबाराजे देशमुख, नातेपुते एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धैर्यशील देशमूख, व्हा.चेअरमन संतोष काळे, सेक्रेटरी महेश शेटे, मार्केट कमिटी उपसभापती मामासाहेब पांढरे, मुख्याध्यापक विठ्ठल पिसे, उपप्राचार्य भारत पांढरे, उपमुख्याध्यापक स्नेहल कूलकर्णी यांनी यशस्वी विद्यार्थी यांचे कौतुक केले.

# अहिंसा पतसंस्था कडुन सायकल वाटप

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/अहमद मुल्ला :** पर्यंती येथील कु.निकिता नरळे या विद्यार्थिनीस अहिंसा पतसंस्थेच्या वतीने सायकल देण्यात आली. सामाजिक कार्यकर्ते इंजि.सुनील पोरे यांच्या हस्ते सायकल देण्यात आली.



**म्हसवड : कु.निकिता नरळे हिला सायकल प्रदान करताना इंजि. सुनील पोरे व उपस्थित मान्यवर**

कार्यक्रमास प्रितम शहा, प्रवीण दोशी, राजेंद्र डोंगरे शाखाधिकारी मासाळ, पंतगे, बाबू मुल्ला, गलंडे सर, मुलींचे पालक श्री नरळे पतसंस्था, कर्मचारी वृंद आदी उपस्थित होते. प्रास्ताविक निरज व्होरा यांनी केले तर आभार आहिरकर यांनी मानले.

# साहेबराव भांड यांचे आल्पशा आजाराने निधन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड :** बिदाल ता.माण येथील प्रगतशील शेतकरी, उद्योजक साहेबराव अनंत भांड यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. साहेबराव भांड यांनी बिदाल ता.माण या गावच्या सामाजिक कार्यात अग्रेसर व प्रभावी विकासासाठी योगदान दिले आहे.



**छाया साहेबराव भांड**

माण तालुका मराठी पत्रकार संघाचे सदस्य विजय ढालपे यांचे ते मामा होते. भांड कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खिलारी यांच्या सह अनेक अधिकारी, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर हजर होते.

# सदाशिवनगर येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**माळशिरस/प्रतिनिधी :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले) महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या वाढदिवसानिमित्त सदाशिवनगर येथील जिल्हा परिषद शाळा येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात आला.



**माळशिरस : सदाशिवनगर येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करताना सोमनाथ भोसले व उपस्थित मान्यवर**

यावेळी रिपाइंचे जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले, तालुका कार्याध्यक्ष समाधान भोसले, तालुका सरचिटणीस मारूती खांडेकर, उपाध्यक्ष शेखर सावंत, शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष दत्ता भोसले, उपसरपंच उदय धाईजे, ग्रामपंचायत सदस्य सुमन भोसले, पत्रकार विष्णू भोगळे, बबन भुजबळ, बापू फडतरे, शहर अध्यक्ष राजेंद्र जाधव, कार्याध्यक्ष अशोक खांडेकर, सरचिटणीस राम बनसोडे, तुकाराम जाधव, पप्पू जाधव, बापू गाडे, नवनाथ सरवदे, विक्रम भोसले, शुभम सावंत, जीवन जाधव, रेखा सावंत, पुनम खांडेकर, कुसुम बनसोडे, बेबी भोसले, आक्काताई जाधव, साक्षी खांडेकर, वैशाली नरळे,मुख्याध्यापक बोराटे सर,शिक्षक समाधान सावंत इत्यादी उपस्थित होते.

# मी असं म्हणालोच नाही : शरद पवार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सातारा :** अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते असल्याचं विधान पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी गुरुवारी केलं होतं. त्या विधानावर शरद पवारांना बारामतीतील पत्रकार परिषदेत विचारणा करण्यात आली असता ते पक्षाचे नेते असल्याचं शरद पवारांनीही म्हटलं होतं. मात्र दुपारी साताऱ्याच्या दहिवडीमधील पत्रकार परिषदेत याबाबत विचारणा केली असता शरद पवारांनी आपण असं विधान केलं नसल्याचं म्हटलं आहे. त्यामुळे शरद पवारांनी घेतलेल्या या दोन वेगवेगळ्या भूमिकांमध्ये राजकीय वर्तुळात तर्क-वितर्कांना उधाण आलं आहे.



**शरद पवार**


**काय म्हणाले होते शरद पवार?**

अजित पवारांबाबत सुप्रिया सुळेंनी केलेल्या विधानावर पत्रकारांनी शरद पवारांना विचारणा केली असता त्यांनी त्या भूमिकेचं समर्थन केलं होतं. अजित पवार आमचे नेते आहेतच. त्यात काही वादच नाही. फूट पडणं याचा अर्थ काय? पक्षात फूट कधी पडते? जर पक्षातलाच एक मोठा वर्ग देश पातळीवर वेगळा झाला तर फूट पडते. आज तशी स्थिती इथे नाही. काही लोकांनी वेगळी भूमिका घेतली तर लोकशाहीत त्यांचा तो अधिकार आहे. त्यांनी वेगळा निर्णय घेतला म्हणून त्यावरून लगेच पक्षात फूट पडली म्हणायचं कारण नाही. तो त्यांचा निर्णय आहे, असं शरद पवार म्हणाले होते.

# अभिनेते मिलिंद सफई यांचे निधन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** ज्येष्ठ मराठी अभिनेते मिलिंद सफई यांचे निधन झालं आहे. मिलिंद यांनी 'आई कुठे काय करते' या मालिकेत अरुंधतीच्या वडिलांची भूमिका साकारली होती.मिलिंद सफई यांनी आतापर्यंत अनेक मराठी चित्रपट व मालिकांमध्ये काम केलंय. मिलिंद यांनी पोश्टर बॉईज, छडी लागे छम छम, प्रेमाची गोष्ट, टार्गेट, मेकअप व थँक यू विठ्ठला यासारख्या मराठी चित्रपटांमध्ये अभिनय केला होता. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमाचे दिग्दर्शक सचिन गोस्वामी यांनी पोस्ट शेअर करत मिलिंद सफईंना श्रद्धांजली वाहिली आहे. मिलिंद यांना कॅन्सर होता आणि त्यांच्यावर उपचार सुरू होते, अशी माहिती समोर आली आहे. मिलिंद सफई यांना मराठी चित्रपटसृष्टीतील कलाकार श्रद्धांजली वाहत आहेत.



**मिलिंद सफई**




# मुंबईत आंतरराष्ट्रीय पर्यटन महोत्सवाचे आयोजन : पर्यटन मंत्री गिरीष महाजन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** शहराला जागतिक पर्यटनाच्या नकाशावर आणण्यासाठी 'दुबई शॉपिंग फेस्टीव्हल'च्या धर्तीवर २० ते २८ जानेवारी २०२४ या कालावधीत मुंबई व उपनगरातील विविध विभागात 'मुंबई आंतरराष्ट्रीय महोत्सवा'चे आयोजन करण्यात येणार आहे. यामुळे राज्याच्या पर्यटन वाढीस चालना मिळणार असल्याचे पर्यटन मंत्री गिरीष महाजन यांनी सांगितले. या महोत्सवाच्या आयोजनासाठी प्रसिद्ध उद्योगपती आनंद महिंद्रा यांच्या अध्यक्षतेखाली फाऊंडेशनची स्थापना करण्यात येणार आहे. मुंबईतील विविध क्षेत्रातील प्रथितयश स्टेक होल्डर्स सहभागी होणार असल्याची माहिती मंत्री श्री. महाजन यांनी दिली. मंत्री श्री.महाजन यांची उद्योगपती श्री. महिंद्रा यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे भेट घेतली. यावेळी पर्यटन विषयावर विस्तृत चर्चा झाली. पर्यटन विभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, पर्यटन संचालक डॉ. बी. एन. पाटील व



**मुंबई : पर्यटन मंत्री गिरीष महाजन यांनी आनंद महिंद्रा यांची भेट घेतली.**

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक श्रद्धा जोशी-शर्मा उपस्थित होत्या.

मंत्री श्री.महाजन म्हणाले की, मुंबई आंतरराष्ट्रीय महोत्सवासाठी स्थापन करण्यात येणाऱ्या फाऊंडेशनमध्ये शासकीय व अशासकीय सदस्यांचा समावेश असेल. फाऊंडेशनच्या निर्मितीमुळे अशा महोत्सवांच्या आयोजनात सातत्य राहील व पर्यटन क्षेत्राशी निगडित व्यावसायिक, स्टेक होल्डर्स, मुंबईतील उद्योजक व इतर क्षेत्रातील प्रथितयश व्यक्तींच्या सहभागामुळे महोत्सवाला आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ मिळणार आहे. राज्याच्या कला व संस्कृतीचे दर्शन घडवून आणण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम, हस्तकला, विविध खाद्य संस्कृती, सायकलिंग टूर, हार्बर टूरिझम,वॉटर स्पोर्टस्, बीच क्टिव्हीटीज आदी साहसी क्रीडा प्रकारचे आयोजन करण्यात येईल. यामध्ये सीटी टूर आयोजकांना एका छत्राखाली आणून शॉपिंग मॉल, कला दालने, चित्रपटगृह, हॉटेल, फूड कोर्ट, साहसी क्रीडा केंद्रे, मनोरंजन केंद्रे, गाइडेड सीटी टूर, हेरिटेज वॉक,नेचर वॉक, फोटोग्राफी, योगा कार्यशाळा असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. राष्ट्रीयव आंतरराष्ट्रीयस्तरावरील पर्यटन क्षेत्राशी निगडित व्यावसायिक व स्टेक होल्डर्स यांचा समावेश असलेल्या परिचय सहल (FAM² Tour), चित्रपट, फॅशनशो इ. उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

या महोत्सवामुळे पर्यटना व्यतिरिक्त विविध क्षेत्रातील गुंतवणूक वाढीस मदत होईल, मुंबईतील पर्यटन वृद्धीस चालना मिळून राज्याच्या महसुलात देखील वाढ होईल, असे पर्यटन मंत्री श्री. महाजन यांनी सांगितले. मुंबईत येणाऱ्या पर्यटकांना उत्तम सोयी-सुविधा देण्याबरोबरच पर्यटन स्थळांच्या ठिकाणी पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे यावेळी मंत्री श्री.महाजन यांनी सांगितले.



